**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत अनुज्ञेय नवीन कामे घेण्याबाबत मार्गदर्शक सूचना.**

**महाराष्ट्र शासन**
नियोजन विभाग (रोहयो)
शासन परिपत्रक क्रमांक. मग्रारोहयो- २०१२/प्र.क्र.३६ /रोहयो-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ९ ऑक्टोबर, २०१२

वाचा :- १) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम २००५,
२) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना दिनांक ४.५.२०१२.

**परिपत्रक**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण योजनेचा मूलभूत उद्देश ग्रामीण कुटुंबातील प्रौढ व्यक्तिंना अकुशल कामाची मागणी केल्यानंतर कामे उपलब्ध करुन देणे आहे. त्याचबरोबर कायम स्वरुपी मालमत्ता निर्माण करुन सामाजिक पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे हा ही या योजनेचा उद्देश आहे. केंद्र शासनाने याकरिता महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कायदा २००५ पारीत केला. सदर कायद्याच्या कलम ४ (३) अंतर्गत अनुसूची (१) मध्ये योजनांतर्गत अनुज्ञेय कामांची यादी दिलेली आहे.

२. केंद्र शासनाने संदर्भाधीन दिनांक ४ मे, २०१२ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार अनुज्ञेय कामाच्या यादीमध्ये वाढ करुन कृषि, पशु संवर्धन, मत्स्य व्यवसाय तसेच पाणी पुरवठा व स्वच्छतेच्या संदर्भातील कामे अनुज्ञेय केली आहेत. केंद्र शासनाच्या अनुसूची (१) मधील अनुज्ञेय कामांची (मराठी भाषांतरीत) प्रत सोबत **"परिशिष्ट -अ"** मध्ये दिली आहे.

३. केंद्र शासनाने नव्याने अनुज्ञेय केलेल्या ३० कामांपैकी काही कामे महाराष्ट्रासाठी नवीन नाहीत, ती पूर्वीपासूनच जलसंधारण विभागामार्फत रोहयो तसेच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत घेण्यात येत आहेत. अशा कामां संदर्भात यापूर्वी देण्यात आलेले आर्थिक व तांत्रिक मापदंड शासनाकडून संकल्पचित्रांसह सुधारित आर्थिक व तांत्रिक मापदंड देण्यात येई पर्यंत वापरण्यात यावेत

४. उपरोक्त अनुज्ञेय ३० कामांपैकी काही नवीन कामांचे आर्थिक व तांत्रिक मापदंड सोबतच्या "परिशिष्ट- ब" मध्ये नमूद केल्याप्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत. तसेच काही कामे अशी आहेत ज्यांचे आर्थिक व तांत्रिक मापदंड भविष्यात निश्चित करावयाची आहेत. तेव्हा तूर्त ज्या नवीन कामांचे आर्थिक व

तांत्रिक मापदंड पूर्वी निश्चित केली आहेत व आता सोबतच्या **परिशिष्ट-ब** मध्ये निश्चित करण्यात येत आहेत, तीच कामे जिल्हयात घेण्यात यावीत. उर्वरित कामांचे आर्थिक व तांत्रिक मापदंड निश्चित केल्यानंतर ती कामे घेण्यात यावीत.

५. <u>उपरोक्त नवीन कामांची अंमलबजावणी करतांना खालील बाबींची दक्षता घेण्यात यावी.</u>

१) ग्राम सभा आणि ग्रामपंचायतीमार्फत मंजूर करण्यात आलेली कामे घेण्यात यावीत.

२) सोबतच्या " परिशिष्ट-ब " मध्ये देण्यात आलेल्या कामांचे आर्थिक व तांत्रिक मापदंड मार्गदर्शनपर (Indicative) आहेत. प्रत्यक्षात स्थानिक परिस्थिती पाहून तसेच संबंधित विभागांनी ( कृषि, पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग इ.) तयार केलेले प्रातिनिधीक स्वरुपाचे आर्थिक व तांत्रिक मापदंड तसेच संकल्पचित्रास अनुसरुन कामांचे अंदाजपत्रक तयार करण्यात यावे.

३) उपरोक्त नवीन ३० कामांपैकी केंद्रीय कायद्याच्या परिशिष्ट-१ मधील कामांच्या यादी मधील अ.क्र. ४, १०, ११, १३ ते १५ येथे नमूद कामे फक्त वैयक्तीक लाभाची कामे आहेत. ही कामे फक्त केंद्रशासनाने निश्चित केलेल्या प्रवर्गास अनुज्ञेय राहतील.

४) वैयक्तिक लाभाच्या कामांसाठी वैयक्तिक जमिन मालक जॉब कार्ड धारक असणे आवश्यक आहे तसेच त्यांनी स्वत: मजूर म्हणून कामे करणे आवश्यक आहे.

६. केंद्र शासनाने अनुज्ञेय केलेल्या नवीन कामांपैकी काही कामांच्या साहित्याचा खर्च अनुज्ञेय ६०:४० प्रमाणा पेक्षा जास्त आहे. म्हणजेच या कामांमध्ये मजुरीच्या खर्चाच्या प्रमाणात साहित्याचा खर्च जास्त आहे. (उदा. गॅबीयन बंधारा, नॅडेप खत, अझोला फार्म, बक-या - शेळयांसाठी शेड इत्यादी. ) त्यामुळे केंद्र शासनाने ही कामे ग्राम पंचायत स्तरावर मर्यादीत संख्येमध्ये घेण्याचे निर्देश दिलेले आहेत. तेव्हा केंद्र शासनाच्या या सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

७. उपरोक्त कामांमुळे कायम स्वरुपी मालमत्ता निर्माण होईल याची दक्षता घ्यावी.

८. सदरच्या शासन परिपत्रकानुसार अनुज्ञेय कामे ज्या विभागाशी / यंत्रणेशी संबंधित आहेत. त्याची यादी खाली देण्यात येत आहे. संबंधित विभाग/यंत्रणा या संदर्भात नमुना अंदाजपत्रक (Model Estimate) आणि संकल्पचित्र अतिशीघ्र निर्गमित करेल.

| अ.क्र. | अनुज्ञेय कामे | संबंधित विभागाचे/यंत्रणेचे नाव |
|---|---|---|
| १ | नॅडॅप खत निर्मितीसाठी खड्डा (टाकी)<br>(Nadep Composting pit) | कृषि विभाग |
| २ | द्रवरुप जैविक खत उत्पादन (अमृत पाणी)<br>(Liquid biomanures) (Amritpani) | कृषि विभाग (फलोत्पादन) |
| ३ | गांडूळ कंपोस्ट सेंद्रीय खतासाठी खड्डा.<br>(Vermi composting pit) | कृषि विभाग |
| ४ | कुक्कुट पालनासाठी शेड<br>(Poultry Shelter) | पशु संवर्धन विभाग |
| ५ | समपातळी चर<br>(Contour Trenches) | मृद संधारण (कृषि) |
| ६ | समपातळी बांध<br>(Contour Bunds) | मृद संधारण (कृषि) |
| ७ | दगडी बांध (Boulder checks) | मृद संधारण (कृषि) |
| ८ | शेत बांध बंदिस्त (Farm bunding) | मृद संधारण (कृषि) |
| ९ | गॅबीयन बंधारा (जाळीचा बंधारा)<br>(Gabion Structures) | मृद संधारण (कृषि) |
| १० | भूमिगत बंधारा (Under Ground dyke) | भू-जल सर्वेक्षण यंत्रणा (GSDA) |
| ११ | माती नाला बांध (Earthen Dam) | मृद संधारण (कृषि) |
| १२ | शेत तळे (Dug out farm ponds) | मृद संधारण (कृषि) |
| १३ | शेळयांचा गोठा (Goat shelter) | पशु संवर्धन विभाग |
| १४ | कन्स्ट्रक्शन ऑफ पक्का फ्लोअर<br>(Construction of pacca floor, Urine Tank and Fodder trough for cattle) | पशु संवर्धन विभाग |
| १५ | अझोलासाठी खड्डा.(Azolla as cattle feed supplement) | पशु संवर्धन विभाग |
| १६ | सार्वजनिक ठिकाणी (हंगामी) मत्स्यपालन करणे<br>(Fisheries in seasonal water bodies on public land) | मत्स्यव्यवसाय |
| १७ | समुद्र किना-यावर मासे सुकविण्याकरीता कॉंक्रिटचा ओटा बांधणे<br>(Fish drying yard in coastal area) | मत्स्यव्यवसाय |
| १८ | शोष खड्डा (Soak pits) | पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग |
| १९ | पुनर्भरण खड्डा (Recharge pits) | पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग |

९. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१२१००८१०५१४६१७१६ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( व्ही. गिरीराज )
प्रधान सचिव (रोहयो)

प्रति,

मा.राज्यपालांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव
मुख्य सचिवांचे स्वीय सहायक
अतिरिक्त मुख्य सचिव
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०००३२
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपूर
आयुक्त (कृषी), महाराष्ट्र राज्य , पुणे
संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे
संचालक, फलोत्पादन, पुणे
संचालक, सामाजिक वनीकरण, पुणे
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परिक्षा ) मुंबई/नागपूर
सर्व मुख्य अभियंता व सह सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
सर्व मुख्य अभियंता व सह सचिव, जलसंपादा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे, (स्थानिक स्तर) विभाग पुणे
सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो)
कक्ष अधिकारी, संग्राम कक्ष, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई – ४०००३२ (महाऑनलाईनवर प्रसिध्दीसाठी)
सर्व जिल्हा अधिक्षक , कृषि अधिकारी,
सर्व उपसचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी नियोजन विभाग (रोहयो)
सारसंग्रह रोहयो – १ / निवडनस्ती (रोहयो.१)

## परिशिष्ट – अ

### अनुसूची -१

(कलम ४ (३) पहावे)

(ग्रामीण रोजगार हमी योजनेचे किमान वैशिष्ठे)

| अ.क्र. | कलम | नमूद बाबी |
|---|---|---|
| १ | *** | |
| २ | १ | योजनेच्या कलम ४ (३) अन्वये सर्व राज्यात ही योजना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना या नावाने ओळखली जाईल व या योजनेच्या संबंधातील सर्व कागदपत्रात त्याचा उल्लेख महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कायदा २००५ (४२/२००५) असा होईल. |
| ३ | 1 A | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना यापुढे महात्मा गांधी NREGS म्हणून ओळखली जाईल आणि यापुढे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कायदा २००५ च्या संदर्भात महात्मा गांधी NREGA असा उल्लेख केला जाईल. |
| ४ | 1 B | ;योजनेचा प्रमुख भर खालीलप्रकारच्या कामांवर राहील तसेच ग्रामसभा व वॉर्ड सभेच्या माध्यमातून प्रत्येक ग्राम पंचायतीच्या बैठकीत आपल्या क्षेत्रामध्ये कामाचे प्राधान्यक्रम निश्चित करेल.<br>I) जलसर्वर्धन व जलसंधारण ज्यामध्ये समपातळी चर, समपातळी बांध, दगडी बांध, गॅबियन बंधारा (जाळीचा बंधारा), भूमिगत बंधारा, मातीनाला बांध (मातीचा बांध), CNB सिंमेट नाला बांध, Spring Shed development.<br>II) दुष्काळ निवारणाची कामे ज्यात वनीकरण व वृक्षारोपन समावेश आहे.<br>III) सिंचन कालव्याची कामे ज्यात सुक्ष्म व लघूसुक्ष्म सिंचन कामाचा समावेश आहे.<br>IV) परिच्छेद १ सी मध्ये नमूद केल्यानुसार कुटूंबाच्या स्वत:च्या मालकीच्या जमीनीवर सिंचन सूविधाच्या सोई, शेततळे, फळबाग लागवड, वृक्ष लागवड, शेतबांध बंदिस्ती इत्यादी भु-सुधाराची कामे<br>V) पारंपारिक तलावांचे नुतनीकरण व ज्यांच्या अंतर्गत तलावाचे गाळ काढणे इत्यादी.<br>VI) भूविकास<br>VII) पुरनियंत्रण व पुर संरक्षकाची कामे ज्या अंतर्गत पुर नियंत्रण नाल्याचे खोलीकरण करणे आणि त्यांची दुरुस्ती करणे, चरांचे नुतनीकरण, तटीय क्षेत्राच्या संरक्षणासाठी भर्तीच्या वेळी घुसलेल्या पाण्याच्या निसरणासाठी नाल्याचे बांधकाम.<br>VIII) ग्रामीण भागात बारमाही वाहतूकीकरीता कलव्हर्टससहीत गावांना जोडणारे रस्ते.<br>IX) पंचायत स्तरावर ग्राम ज्ञान संसाधन केंद्राच्या रुपात भारत निर्माण |

| | | |
|---|---|---|
| | | राजीव गांधी सेवा केंद्र आणि ग्राम पंचायत स्तरावर ग्राम पंचायत भवन निर्माण करणे.<br>X) कृषि विषयक कामे जसे एनएडीईपी कंपोष्टिंग, गांडूळ खत तयार करणे<br>(Vermi composting). जैविक खते (Liquid Bio manures)<br>XI) पशुधन विषयक कामे जसे की कुक्कूटपालनासाठी शेड, शेळयाबक-यांसाठी शेड, कोबा करणे (Construction of pucca floor),<br>युरिन टँक, चारा साठविण्याची व्यवस्था, अझोलापुरक पशुखादय देण्याची व्यवस्था.<br>XII) मत्स्यव्यवसाय अनुषंगाने कामे- जसे की सार्वजनिक जमीनीवर हंगामी साचणा-या पाण्यावर मत्स्यव्यवसाय करणे.<br>XIII) समुद्रकिनारी भागातील कामे जसे की, समुद्रकिना-यावर मासे सुकविण्यासाठी क्षेत्र (Fish Drying yards) उपलब्ध करुन देणे, बेल्ट व्हेजिटेशन इत्यादी.<br>XIV) ग्रामीण भागात पिण्याचे पाणी पुरवठा विषयक कामे जसे की, पिण्याच्या पाण्यासाठी साठवण खड्डे, पुर्नभरण खड्डे,<br>XV) ग्रामीण स्वच्छतेसंबंधी कामे जसे की, वैयक्तिक शौचालये, शाळेकरीता शौचालये, अंगणवाडी शौचालय, घनकचरा व्यवस्थापन.<br>XVI) केंद्र शासनाने राज्य शासनाशी चर्चा करुन ठरवलेली इतर कामे |
| ५ | 1 C | परिच्छेद १ B च्या उप परिच्छेद IV. X, XI आणि XIII ते XV मध्ये नमूद सर्व कामे अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती , दारिद्रय रेषेखालील कुटूंब किंवा भूसुधार योजनेचे लाभार्थी किंवा भारत सरकारच्या इंदिरा आवास योजनेचे लाभार्थी किंवा कृषि कर्ज माफी योजना २००८ नुसार लघु व सिमांत शेतकरी व अनुसूचीत जमाती व अन्य परंपरागत वन निवासी (जे वन अधिकारास मान्यता अधिनियम २००६ (२/ २००७ )चे लाभार्थी आहेत त्यांच्या जमीनीवर कामे घेता येतील. |
| ६ | 1 D | परिच्छेद १ B च्या उप परिच्छेद IV. X, XI आणि XIII ते XV मधील कामे खालील शर्थीच्या अधीन राहून घेता येतील.<br>अ) परिच्छेद १C मध्ये नमूद केल्याप्रमाणे कुटूंबाकडे जॉब कार्ड असणे आवश्यक आहे व<br>ब) लाभार्थी त्यांच्या जमीन व गावठाणच्या जागेवर घेतलेल्या प्रकल्पावर काम करतील. |
| ७ | २ | टिकाऊ स्वरुपाची मालमत्ता निर्माण करणे व ग्रामीण भागातील गरीब माणसांच्या उपजिवीकेच्या संसाधनास मजबुती प्रदान करणे हा या योजनेचा महत्वाचा उद्देश आहे. |

# परिशिष्ट-ब

| कामाचा क्रमांक | कामाचे नांव | | अस्तित्वातील दरसूची | | मजूरी व साहित्याचे प्रमाण | सार्वजनिक/ वैयक्तिक लाभाची कामे | कार्यान्वयीत यंत्रणेचे नांव | तांत्रिक मान्यता | प्रशासकीय मान्यता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | इंग्लिश | मराठी | केंद्राची | राज्याची | | | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | Contour Trenches | समपातळी चर | रु. ११ हजार प्र. हे.रु. १७/- (Per running meter) | उतारा-नुसार | १०० : ०० ( केंद्र ) उतारा-नुसार (राज्य) | सार्वजनिक | ग्रामपंचायत | पंचायत समितीचे तांत्रिक अधिकारी | गटविकास अधिकारी | १) अनुज्ञेय यादीतील कामे २) कामाचे अद्यावत आर्थिक व तांत्रिक मापदंड व संकल्पचित्र संचालक, मृदसंधारण यांच्याकडून निश्चित करण्यात येईल. तोपर्यन्त सद्या प्रचलित मापदंडानुसार काम करावे. |
| २ | Contour bunds (Graded Bunds) | समपातळी बांध | रु. १४ हजार प्र.हे. रु. ४२/- (Per running meter) | जमीनीच्या प्रकारा-नुसार | ८५ : १५ (केंद्र) १०० : ०० (राज्य) | सार्वजनिक | ग्रामपंचायत | पंचायत समितीचे तांत्रिक अधिकारी | गटविकास अधिकारी | १)अनुज्ञेय यादीतील कामे २) कामाचे अद्यावत आर्थिक व तांत्रिक मापदंड व संकल्पचित्र संचालक, मृदसंधारण यांच्याकडून निश्चित करण्यात येईल. तोपर्यन्त सद्या प्रचलित मापदंडानुसार काम करावे. |
| ३ | Boulder checks | दगडी बांध | ७ मीटर (लांबी) x १ मीटर (उंची) x ०.५ मीटर (रुंदी) = रुपये ४०००/- | | १०० : ०० ( केंद्र ) १०० : ०० ( राज्य ) | सार्वजनिक | ग्रामपंचायत | पंचायत समितीचे तांत्रिक अधिकारी | गटविकास अधिकारी | १)अनुज्ञेय यादीतील कामे २) कामाचे अद्यावत आर्थिक व तांत्रिक मापदंड व संकल्पचित्र संचालक, मृदसंधारण यांच्याकडून निश्चित करण्यात येईल. तोपर्यन्त सद्या प्रचलित मापदंडानुसार काम करावे. |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | Farm bunding | शेत बांध बंदिस्ती | ०.६ मीटर (उंची) X १.७ मीटर (रुंदी) एकूण क्षेत्र ०.५७ चौरस मीटर = रुपये ८०००/- प्रति हेक्टर ( Rs. 40/- Per Running Meter) | १०००० ते १४००० जमीनीच्या प्रकारा-नुसार | ८५ : १५ (केंद्र) ८६ : १४ ते ९० : १० (राज्य) | वैयक्तिक | ग्रामपंचायत व कृषि विभाग | पंचायत समितीचे तांत्रिक अधिकारी (कृषि) अधिकारी | गटविकास अधिकारी / तहसिलदार | १)अनुज्ञेय यादीतील कामे<br>२) कामाचे अद्यावत आर्थिक व तांत्रिक मापदंड व संकल्पचित्र संचालक, मृदसंधारण यांच्याकडून निश्चित करण्यात येईल. तोपर्यन्त सद्या प्रचलित मापदंडानुसार काम करावे. |
| ५ | Gabion structures | गॅबियन बंधारा (जाळीचा बंधारा) | रुपये ४५०००/- (२ मीटर उंची x १ मीटर वरील रुंदी x १२ मीटर लांबी) | | ३० : ७० (केंद्र) ३५ : ६५ (राज्य) | सार्वजनिक | कृषि विभाग | कृषि अधिकारी (काम तांत्रिक स्वरुपाचे असल्यामुळे कृषि विभागामार्फत करणे ) | तहसिलदार | १)अनुज्ञेय यादीतील कामे<br>२) कामाचे नवीन आर्थिक व तांत्रिक मापदंड व संकल्पचित्र कृषि विभागाकडून निश्चित करण्यात येईल.<br>३) कृषि विभागामार्फत राबविण्यात येईल. |
| ६ | Under-ground dykes | भूमिगत बंधारा | रु. ४३०००/- (१२ मीटर लांबी ६ मीटर खोली २ मीटर रुंदी. ( वरील) | | ७० : ३० (केंद्र) | सार्वजनिक | GSDA | GSDA चे अधिकारी | तहसिलदार | कामाचे नवीन आर्थिक, तांत्रिक मापदंड व संकल्पचित्र लवकरच निश्चित करण्यात येतील. हे काम उच्च तांत्रिक स्वरुपाचे असल्यामुळे GSDA मार्फतच करण्यात येईल. |
| ७ | Earthen dams | माती नाला बांध (मातीचे बांध) | रु. २.६ लक्ष ६५ मीटर लांबी ४.६५ मीटर ऊंची (जास्तीत जास्त ) उतार २ : १ ते २.५ : १ (वरील रुंदी मीटर) किंवा रुपये २०/- ते ३०/- प्रति क्युबिक मीटर पाणी साठा | उतारा-नुसार | ९५ : ०५ (केंद्र) १०० : ०० (राज्य) | सार्वजनिक | कृषि विभाग | कृषि अधिकारी | तहसिलदार | १)अनुज्ञेय यादीतील कामे<br>२) कामाचे नवीन आर्थिक व तांत्रिक मापदंड व संकल्पचित्र कृषि विभागाकडून निश्चित करण्यात येईल.<br>३) कृषि विभागामार्फत राबविण्यात येईल. |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | Dug out farm ponds | शेततळे | | | | वैयक्तिक | कृषि विभाग/ ग्राम पंचायत | कृषि अधिकारी / पंचायत समितीचे तांत्रिक अधिकारी | तहसिलदार/ गटविकास अधिकारी | शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१२/प्र.क्र.२४/रोहयो-१, दि. २१/८/२०१२ अन्वये आर्थिक व तांत्रिक मापदंड निश्चित करण्यात आलले आहे. त्याचा वापर करावा. |
| ९ | Stop dams | CNB सिमेंट नाला बांध | | | | सार्वजनिक | - | - | - | साहित्याचा खर्च मोठ्या प्रमाणात असल्यामुळे नरेगा अंतर्गत ही कामे घेण्याबाबत यथावकाश सूचना निर्गमित करण्यात येतील. |
| १० | Spring-shed development | | | | | | | | | सदर कामाबाबत विचारविनिमय सुरु असून आवश्यकतेनुसार योग्यवेळी सूचना निर्गमित करण्यात येतील. |
| ११ | Nadep composting pit | नॅडिप खत निर्मिती-साठी खडडा (टाकी) | रु. ८ हजार (३.६ मीटर x १.५ मीटर x ०.९ मीटर) | रु. ८,६६६/- | २५ : ७५ (केंद्र)<br>२५ : ७५ (राज्य) | वैयक्तिक | ग्राम पंचायत / कृषि | तांत्रिक अधिकारी पंचायत समिती/ कृषि | गटविकास अधिकारी/ तहसिलदार | १) फक्त वैयक्तिक लाभासाठी नरेगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार.<br>२) प्रथमत: प्रत्येक कुटूंबास १ खड्डा याप्रमाणे सर्व अनुज्ञेय कुटूंबास खड्डे वाटप करण्यात यावेत. तद्नंतर आवश्यकता व मागणीनुसार त्या कुटूंबांना परत खड्डे वाटप करता येईल.<br>३) कामाचे नवीन आर्थिक व तांत्रिक मापदंड व संकल्पचित्र कृषि विभागाकडून पाठविण्यात येईल. |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १२ | Vermi composting pit | गांडूळ खत निर्मिती साठी खड्डा. | रु. ९ हजार | रु. ९ हजार | २५ : ७५ (केंद्र) २५ : ७५ (राज्य) | वैयक्तिक | ग्राम पंचायत / कृषि | तांत्रिक अधिकारी पंचायत समिती/ कृषि | गटविकास अधिकारी/ तहसिलदार | फक्त वैयक्तिक लाभासाठी नरेगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार.<br>२) प्रथमत: प्रत्येक कुटूंबास १ खड्डा याप्रमाणे सर्व अनुज्ञेय कुटूंबास खड्डे वाटप करण्यात यावेत. तद्नंतर आवश्यकता व मागणीनुसार परत त्या कुटूंबांना खड्डे वाटप करता येईल.<br>३) कामाचे नवीन आर्थिक व तांत्रिक मापदंड व संकल्पचित्र कृषि विभागाकडून निश्चित करण्यात येईल. |
| १३ | Liquid biomanures pit | संजिवक किंवा अमृत पाण्यासाठी खड्डा. | रुपये २०००/- (१ मीटर x १ मीटर x १ मीटर) | रु. २०००/- | ३० : ७० (केंद्र) | वैयक्तिक | ग्राम पंचायत / कृषि | कृषि अधिकारी पंचायत समिती/तालुका कृषि अधिकारी | गट विकास अधिकारी/ तहसिलदार | १) फक्त वैयक्तिक लाभासाठी नरेगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार.<br>२) एका लाभार्थ्यास एकावेळी जास्तीत जास्त ३ संजिवन खड्डे देता येतील.<br>३) कामाचे नवीन आर्थिक व तांत्रिक मापदंड व संकल्पचित्र कृषि विभागाकडून निश्चित करण्यात येईल. |
| १४ | Poultry shelter | कुक्कुट पालना-साठी शेड | रु. ४० हजार | रु. ४८ हजार | २० : ८० केंद्र २६ : ७४ राज्य | वैयक्तिक | ग्रामपचांयत | पशुधन विकास अधिकाकारी (पंचायत समिती) | गटविकास अधिकारी | १) वैयक्तिक लाभासाठी<br>२) कामाचे नवीन आर्थिक व तांत्रिक मापदंड व संकल्पचित्र पशुसंवर्धन विभागाकडून देण्यात येईल.<br>३)भूमिहीन व्यक्तींना प्राधान्य.<br>४) सदर कामांमध्ये साहित्यांवर होणारा खर्च हा जादा असल्यामुळे प्रति ग्राम पंचायत फक्त ५ कामे घेण्यात यावीत. |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १५ | Goat shelter | शेळयांचा गोठा | रु. ३५०००/- | रु.५१८५६/- | २५ : ७५ (केंद्र)<br>२५ : ७५ (राज्य) | वैयक्तिक | ग्रामपचांयत | पशुधन विकास अधिकारी (पंचायत समिती) | गटविकास अधिकारी | १) वैयक्तिक लाभासाठी<br>२) कामाचे नवीन आर्थिक व तांत्रिक मापदंड व संकल्पचित्र पशुसंवर्धन विभागाकडून देण्यात येईल.<br>३)भूमिहीन व्यक्तींना प्राधान्य.<br>४) सदर कामांमध्ये साहित्यांवर होणारा खर्च हा जादा असल्यामुळे प्रति ग्राम पंचायत फक्त ५ कामे घेण्यात यावीत. |
| १६ | Construction of Pucca Floor, Urine Tank and Fodder Trough for Cattle | | रु.३५००० प्रति युनिट | रु ४२०९५ (छत विरहित)<br>रु. ७००२६ (छतासह) | ३० : ७० (केंद्र)<br>२० : ८० (राज्य) | वैयक्तिक | ग्रामपचांयत | पशुधन विकास अधिकारी (पंचायत समिती) | गटविकास अधिकारी | १) वैयक्तिक लाभासाठी<br>२) कामाचे नवीन आर्थिक व तांत्रिक मापदंड व संकल्पचित्र पशुसंवर्धन विभागाकडून देण्यात येईल.<br>३)भूमिहीन व्यक्तींना प्राधान्य.<br>४) सदर कामांमध्ये साहित्यांवर होणारा खर्च हा जादा असल्यामुळे प्रति ग्राम पंचायत फक्त ५ कामे घेण्यात यावीत. |
| १७ | Azolla as cattle feed supplement (pit) | अझोला-साठी खड्डा | रु. २०००/- | रु. २०००/- | १५ : ८५ (केंद्र)<br>१२.९५ : ८७.०५ (राज्य) | वैयक्तिक | ग्रामपचांयत | पशुधन विकास अधिकारी (पंचायत समिती) | गटविकास अधिकारी | १) वैयक्तिक लाभासाठी<br>२) कामाचे नवीन आर्थिक व तांत्रिक मापदंड व संकल्पचित्र पशुसंवर्धन विभागाकडून देण्यात येईल. |
| १८ | Fisheries in seasonal water bodies on public land | सार्वजनिक ठिकाणी (हंगामी) मत्स्यपालन करणे | रु. ११.०० लाख | रुपये. १५,०८,२१० | ८० : २० (केंद्र)<br>९७ :०३ (राज्य) | सार्वजनिक | ग्रामपचांयत | तांत्रिक अधिकारी (पंचायत समिती) | गटविकास अधिकारी | कामाचे नवीन आर्थिक व तांत्रिक मापदंड व संकल्पचित्र मत्स्यव्यवसाय विभागाकडून देण्यात येईल. |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९ | Fish drying yard in coastal area. | समुद्रकिनाऱ्यावर सार्वजनिक ठिकाणी मासे सुकविण्याकरीता कॉंक्रिटचा ओटा बांधणे | रु. ७५०००/- १० मीटर x १० मीटर | रु.९९२०९ | १५ : ८५ (केंद्र) १५ : ८५ (राज्य) | सार्वजनिक | ग्रामपचांयत | तांत्रिक अधिकारी (पंचायत समिती) | गटविकास अधिकारी | कामाचे नवीन आर्थिक व तांत्रिक मापदंड व संकल्पचित्र मत्स्यव्यवसाय विभागाकडून देण्यात येईल. |
| २० | Belt vegetation | | | | | | | | | सदर कामाबाबत विचारविनिमय सुरु असून आवश्यकतेनुसार योग्यवेळी सूचना निर्गमित करण्यात येतील. |
| २१ | Constn of storm water drains for | | | | | | | | | सदर कामाबाबत विचारविनिमय सुरु असून आवश्यकतेनुसार योग्यवेळी सूचना निर्गमित करण्यात येतील. |
| २२ | Soak pits | शोष खड्डा | रु. २ हजार | रु. २,१११/- | ५० : ५० केंद्र ५५ : ४५ राज्य | सार्वजनिक/ वैयक्तिक | ग्राम पंचायत | पंचायत समितीचे तांत्रिक अधिकारी | गटविकास अधिकारी | १) सार्वजनिक जागेस प्राथम्य<br>२) वैयक्तिक असल्यास मार्गदर्शक तत्वानुसार<br>३) स्थानिक वस्तूंचा खरेदी करुन<br>४) NRDWP अंतर्गत हे काम घेतले नसेल तरच MREGS मध्ये घ्यावे.<br>५) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या मापदंडानुसार |
| २३ | Recharge pits | पुनर्भरण खड्डा | रु. ५ हजार | रु. ६६३४/- | ५० : ५० केंद्र ३९ : ६१ राज्य | सार्वजनिक / वैयक्तिक | ग्राम पंचायत | पंचायत समितीचे तांत्रिक अधिकारी | गटविकास अधिकारी | १) सार्वजनिक जागेस प्राथम्य<br>२) वैयक्तिक असल्यास मार्गदर्शक तत्वानुसार<br>३) स्थानिक वस्तूंचा खरेदी करुन<br>४) NRDWP अंतर्गत हे काम घेतले नसेल तरच MREGS मध्ये घ्यावे. |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २४ | Indl. HH latrines | वैयक्तिक शौचालय | | | | | | | | शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१२/प्र.क्र.२०३/पापू-१६, दि.२७.०८.२०१२ अन्वये पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने मापदंड निश्चित केले आहेत व मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. त्याप्रमाणे अंमलबजावणी करावी. |
| २५ | School toilet units | शाळांमधील शौचालय | | | | | | | | शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१२/प्र.क्र.२०३/पापू-१६, दि.२७.०८.२०१२ अन्वये पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने मापदंड निश्चित केले आहेत व मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्यात यावी. |
| २६ | Anganwadi toilets | अंगणवाडीतील शौचालय | | | | | | | | शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१२/प्र.क्र.२०३/पापू-१६, दि.२७.०८.२०१२ अन्वये पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने मापदंड निश्चित केले आहेत व मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्यात यावी. |
| २७ | Solid and liquid waste | | | | | | | | | सदर कामाबाबत विचारविनिमय सुरु असून आवश्यकतेनुसार योग्यवेळी सूचना निर्गमित करण्यात येतील. |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २८ | Deepening and repair of flood channels | | | | | | | | | सदर कामाबाबत विचारविनिमय सुरु असून आवश्यकतेनुसार योग्यवेळी सूचना निर्गमित करण्यात येतील. |
| २९ | Chaur renovation | | | | | | | | | सदर कामाबाबत विचारविनिमय सुरु असून आवश्यकतेनुसार योग्यवेळी सूचना निर्गमित करण्यात येतील. |
| ३० | Rehab of minors and field channels | | | | | | | | | सदर कामाबाबत विचारविनिमय सुरु असून आवश्यकतेनुसार योग्यवेळी सूचना निर्गमित करण्यात येतील. |